


कऱ्हाड : पी. डी. पाटील प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा महाराष्ट्र भूषण पुरस्कार मंगळवारी डॉ. अभय बंग यांना प्रदान करताना डॉ. अनिल अवचट. त्यावेळी बाळासाहेब पाटील, डॉ. अशोक गुजर, सौ. शालन माळी.

(बातमी पान ३ वर)

# समस्यांवर काम करण्याने जीवनाचे सार्थक

## डॉ. अभय बंग; कऱ्हाडमध्ये पी. डी. पाटील महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मान

**कऱ्हाड, ता. २१ :** जिथे समस्या आहेत, तिथे काम करण्याने जीवनाचे सार्थक होते. सध्या गडचिरोली भागात राबवल्या जाणाऱ्या मुक्तीपथ अभियानामध्ये दारू, तंबाखू, रक्तदाबमुक्त समाजनिर्मितीचा उद्देश आहे. त्यामुळे आरोग्य स्वराज ही संकल्पना केवळ गडचिरोलीला उपयुक्त नसून देशाला, राज्याला गरजेची आहे, असे मत ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अभय बंग यांनी व्यक्त केले.

येथील आदरणीय पी. डी. पाटील गौरव प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणाऱ्या आदरणीय पी. डी. पाटील महाराष्ट्र भूषण पुरस्काराने डॉ. बंग यांना गौरवण्यात आले. त्यावेळी आयोजित समारंभात ते बोलत होते. ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अनिल अवचट अध्यक्षस्थानी होते. प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष आमदार बाळासाहेब पाटील, पंचायत समितीच्या सभापती शालन माळी, प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष डॉ. अशोक गुजर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. बंग म्हणाले, 'समाजात प्रचंड स्पर्धा असताना ज्येष्ठ नेते (कै) पी. डी. पाटील यांनी सलग ४३ वर्षे कऱ्हाडच्या नगराध्यक्षपदी केलेले काम हा एक सामाजिक, राजकीय चमत्कार आहे. त्यामुळे त्यांच्या नावाने मिळणाऱ्या पुरस्काराद्वारे त्यांच्यातील सर्वसमावेशकतेच्या गुणाचा अंश माझ्यात यावा.

राजकीयदृष्ट्या जागृत व प्रगल्भ असणाऱ्या कऱ्हाडसारख्या शहराचे नगराध्यक्षपदी ४३ वर्षे काम करण्याची किमया ज्येष्ठ नेते (कै.) पाटील यांच्या सर्वसमावेशकतेमुळे साधली गेली. त्यामुळे यापूर्वी राज्य शासनाचा महाराष्ट्र भूषण मिळाला असला तरी पी. डी. पाटील यांच्या नावाचा हा पुरस्कारही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या कर्तृत्वामुळे निश्चितपणे मोठा आहे.'

डॉ. अवचट म्हणाले, 'लोक स्वार्थाच्या मागे धावत असताना डॉ. बंग दांपत्याने वैयक्तिक फायद्याकडे पाठ फिरवून गडचिरोलीसारख्या ठिकाणी केलेले काम नोंद घेण्यासारखे आहे. हाल, अपेष्टा सोसून त्यांचे काम सुरू आहे. त्यामुळे या पुरस्काराच्या सन्मानाला डॉ. बंग यांच्या रूपाने योग्य व्यक्ती मिळाली आहे.'

डॉ. गुजर यांनी प्रास्ताविक केले. मुकुंदराव कुलकर्णी यांनी मानपत्राचे वाचन केले. दिलीपराव चव्हाण यांनी आभार मानले.

### 'साप्ताहिक सकाळ'मुळे राज्यभर पोचलो...

**गडचिरोलीत सुरू असलेले काम फारसे कोणाला माहिती नव्हते. मात्र, २५ वर्षांपूर्वी पत्रकारिता करणाऱ्या डॉ. अनिल अवचट यांनी 'शोध आरोग्याचा' या साप्ताहिक सकाळमधील लेखाद्वारे राज्यभर नेले. त्यानंतर महाराष्ट्राने मला भरभरून प्रेम दिल्याचे डॉ. बंग यांनी यावेळी सांगितले.**